दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक २८८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.११ जानेवारी २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## 'प्रताप सरनाईकांची ७८ एकर जमीन ईडीकडून जप्त' : किरीट सोमय्या

**कल्याण : वृत्तसंस्था**

शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांची टिटवाळा गुरुवली येथील १०० कोटींची ७८ एकर जमीन ईडीने जप्त केली असल्याची माहिती भाजप नेते किरीट सोमय्या यांनी दिली आहे. टिटवाळा गुरुवली येथील जमिनीच्या ठिकाणी किरीट सोमय्या यांनी आज प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी घोटाळा केलेली १०० कोटींची रक्कम परत न केल्यास सरनाईक यांच्या अन्य मालमत्ताही ईडी जप्त करण्याची कारवाई करणार असल्याचे सोमय्या यांनी सांगितले. यावेळी सोमय्या यांनी सांगितलं की, एनईसीएलच्या १०० कोटींच्या घोटाळ्याच्या रकमेतून सरनाईक यांनी टिटवाळा गुरुवली येथे ७८ एकर जमीन विकत घेतली होती. ही जमीन ईडीने जप्त करण्याची नोटीस २०१४ सालीच काढली होती. आता ही जमीन जप्त करण्याची कारवाई ईडीने केली आहे. १०० कोटी रुपये सरनाईक यांनी परत न केल्यास ईडी सरनाईकांच्या अन्य मालमत्ताही जप्त करण्याची कारवाई करणार असल्याचे सोमय्या यांनी सांगितले.

# देवेंद्र फडणवीस, राज ठाकरेंसह अनेक नेत्यांच्या सुरक्षेत मोठी कपात

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात सत्तांतर झाल्यानंतर भाजपा आणि शिवसेनेत कायमचं बिनसलं अन् शिवसेनेने थेट काँग्रेस-राष्ट्रवादीशी घरोबा केला. महाविकास आघाडीच्या माध्यमातून राज्यात तिन्ही पक्ष सत्तेवर आले, त्यामुळे सर्वाधिक जागा मिळूनही भाजपाला विरोधी बाकावर बसावं लागलं. यानंतर केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील वादामुळे भाजपा आणि सत्ताधारी एकमेकांवर कुरघोडीचं राजकारण करू लागले.

आता महाविकास आघाडीने घेतलेल्या एका निर्णयाने देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना दणका बसला आहे. देवेंद्र फडणवीस आणि चंद्रकांत पाटील यांची सुरक्षाव्यवस्था कमी करण्याचा निर्णय ठाकरे सरकारने घेतला असून आता फडणवीसांच्या ताफ्यातील बुलेटप्रुफ वाहन काढण्यात आले आहे, तर विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर यांचीही सुरक्षा कमी करण्यात आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, प्रसाद लाड यांना विशेष सुरक्षा यापुढे नसणार आहे. मध्यंतरीच्या काळात देवेंद्र फडणवीस नक्षलवाद्यांच्या हिटलिस्टवर असल्याची चर्चा होती. त्यामुळे त्यांच्या निकटवर्तीयांना चिंता लागली होती. मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली होती. त्यांच्या



कारकिर्दीत अनेक नक्षलवादीविरोधी निर्णय घेतल्याने त्यांच्या जीवाला धोका कायम असल्याचं बोललं जात आहे.

रात्री उशीरा फडणवीसांना असणाऱ्या सुरक्षा व्यवस्थेतून पायलट वाहन आणि बुलेटप्रुफ गाडी काढून घेण्यात आली. काही दिवसांपूर्वी महाविकास आघाडीच्या सरकारमधील उच्चपदस्थ मंत्री अधिकाऱ्यांच्या बैठकीत नेत्यांना मिळणाऱ्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला. याच बैठकीत देवेंद्र फडणवीसांच्या ताफ्यातील बुलेटप्रुफ वाहन काढण्याची सूचना देण्यात आली अशी चर्चा सुरु आहे. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने वाय दर्जाच्या सुरक्षेची शिफारस केली होती, यापूर्वी देवेंद्र फडणवीसांना झेड प्लस सुरक्षा होती.

इतकचं नाही तर काही मंत्र्याची सुरक्षाही कमी करण्यात आली आहे. यात संजय बनसोडे, अस्लम शेख यांचा समावेश आहे. तर भाजपाच्या चंद्रकांत पाटील, प्रसाद लाड, कृपाशंकर सिंह यांची सुरक्षा काढण्यात आली आहे. महत्त्वाच्या व्यक्तीच्या सुरक्षेबाबत वेळोवेळी अधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात येतो, ठाकरे कुटुंबाच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केले जातात.

राज्यात सत्तांतर झाल्यानंतर पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या सुरक्षेत वाढ करत त्यांना वाय दर्जावरून झेड दर्जाची सुरक्षा देण्यात आली आहे. तर राज ठाकरेंच्या सुरक्षेतही कपात करण्याचा निर्णय ठाकरे सरकारने घेतला आहे. राज ठाकरेंना झेड सिक्युरिटी मिळत होती त्याठिकाणी आता वाय सिक्युरीटी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

## संक्षिप्त...

### अंबरनाथमध्ये ज्वेलर्सवर दरोडा, गोळीबारात ३ जखमी

**कल्याण : वृत्तसंस्था**

अंबरनाथ मधील सर्वोदय नगर परिसरातील भवानी ज्वेलर्सच्या दुकानात दरोडा घालत प्रतिकार करणाऱ्या तिघावर गोळीबार व चाकूने हल्ला केल्याची घटना घडली आहे. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. दरोड्याचा उद्देशाने आलेल्या चार हल्लेखोरासमवेत दुकानाच्या मालकासह दोघाची झटापट झाली. यावेळी दरोडेखोरांनी गोळीबार करत चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात तिघेही जखमी झालेत. दरम्यान या दरोडेखोरांनी सुमारे २५ तोळे सोने लंपास करत तेथून पळ काढला. आज दुपारी एक वाजताच्या सुमारास ही घटना घडली. दुचाकीवरून आलेले चार हल्लेखोर दुकानात शिरले आणि त्यांनी दुकानातील कर्मचाऱ्यांना बंदुकीचा आणि चाकूचा धाक दाखवून दुकानातील मुद्देमाल लुटला. त्यानंतर चारही जण मुद्देमाल घेऊन दुकाना बाहेर पडत असताना दुकानाचे मालक बलीत सिंग, लक्ष्मण सिंग तिथे आले आणि त्यांनी या हल्लेखोरांना रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी दुकानाचा कर्मचारी भैरव सिंग हा देखील आला. या सर्वांमध्ये झटापट झाली. यावेळी हल्लेखोरांनी आपल्याजवळील बंदूकीतून या तिघांवर पाच ते सहा राऊंड फायर केले. तसेच चाकूने हल्ला केला. यात तिघेजण जखमी झाले असून त्यांना उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आले. या हल्ल्यानंतर दरोडेखोरांनी तेथून पळ काढला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. आरोपींना शोधण्यासाठी पोलिसांनी पाच पथक विविध ठिकाणी रवाना केली आहेत. दिवसाढवळ्या भरवस्तीत घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

## शिवसेना सोडणाऱ्यांना दुसरीकडे करमत नाही, पाच पक्ष विरोधात असूनही मताधिक्य कायम : आ.भरत गोगावले

### तुर्भे बुद्रुक काँग्रेस कार्यकर्त्यांचा सेनाप्रवेश

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

गेल्यावर्षी विधानसभा निवडणुकीत काँग्रेससोबत राष्ट्रवादी काँग्रेस, शेकापक्ष, मनसे असे सगळे मिळून पाच राजकीय पक्ष विरोधात असूनही २०१४ प्रमाणेच मताधिक्य कायम राहिले कारण निती चांगली ठेवली. कोणी काहीही बोलले तरी निवडून आपणच येणार, अशी परिस्थिती असून शिवसेना सोडणाऱ्यांना दुसरीकडे करमत नाही. फक्त शिवसेनाच सन्मानाने वागविते, असा सूचक इशारा आ.भरत गोगावले यांनी पोलादपूर तालुक्यातील तुर्भे बुद्रुक येथील छ.शिवाजी महाराज चौकात काँग्रेस कार्यकर्त्यांचा शिवसेनेमध्ये प्रवेश करण्याच्या जाहिर कार्यक्रमावेळी दिला.




यावेळी आ.गोगावले यांच्यासमवेत व्यासपिठावर राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, पुणे येथील हॉटेल व्यावसायिक अनिल गोळे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, पं.स.सदस्य यशवंत कासार, अनिल भिलारे, लक्ष्मण मोरे, दशरथ उतेकर, गणपत उतेकर, शहरप्रमुख सुरेश पवार आणि अन्य पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी तुर्भे बुद्रुक ग्रामपंचायतीच्या सरपंच वासंती भावेकर यांच्यासह तुर्भे पंचक्रोशीतील आध्यात्मिक क्षेत्रातील बुजूर्गदेखील यावेळी व्यासपिठावर उपस्थित होते.

आ.गोगावले यांनी यावेळी, बोरजच्या सभामंडपासोबतच तुर्भे येथील लक्ष्मी नारायण मंदिरासाठीही आमदारनिधीतून पत्र देणार असून मुख्यमंत्री ना.उध्दव ठाकरे यांनी कोरोना काळात जनतेच्या आरोग्यासाठी अन्य विकासकामांसाठीचा निधी थांबविला होता. तो पुन्हा सुरू झाल्याने आता नळपाणी योजना, लोहारे तुर्भेखोंडा रस्त्यासह अनेक .../२

## खेळाच्या किरकोळ वादातून १३ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू

**दै.रायगड नगरी । पेण**

क्रिकेट खेळायला गेलेल्या मुलांमध्ये खेळण्या वरून झालेल्या किरकोळ वादातून एका मुलाने प्रेम मंगेश दळवी या १३ वर्षीय मुलाच्या डोक्यात बॅट मारल्याने झालेल्या दुखापतीत त्याच्या दुर्दैवी मृत्यू झाला.



याबाबत सविस्तर वृत्त असे की सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक मंगेश रघुनाथ दळवी हे मूळचे मांगरूळ गावचे रहिवासी असुन सध्या ते पेण येथील सद्गुरू पार्क या सोसायटीमध्ये कुटुंबीयांसमवेत राहतात. प्रेम मंगेश दळवी (१३) हा सोसायटीतील मित्रांसोबत शनिवारी सायंकाळी सोसायटीच्या कंपाउंड मध्ये क्रिकेट खेळत होता. सायंकाळी ५:२० च्या दरम्यान खेळण्याच्या किरकोळ वादातून त्याच्या डोक्यावर दुसऱ्या १३ वर्षीय मुलाने बॅट मारली. त्यामुळे प्रेमचा मृत्यू झाला. सदर घटना सोसायटीतील रहिवाशांना कळताच त्यांनी प्रेम ला हॉस्पिटलमध्ये नेले परंतु गंभीर इजा झाल्याने प्रेम चा मृत्यू झाला होता असे पेण येतील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी घोषित केले.

सदरची दुःखद घटना कळताच उपजिल्हा रुग्णालया बाहेर हजारोंच्या संख्येने नागरिक जमा झाले होते. या घटनेमुळे पेण तालुक्यातील नागरिक हळहळ व्यक्त करीत आहेत.

## बोर्ली स्टँडवर खड्ड्यांचे साम्राज्य : सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या अनेक दिवसांपासून साळाव-मुरुड रस्त्यावर बोर्ली स्टँडनजीक रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य असून याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष असल्याबाबत वाहनचालक व नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे.

साळाव-मुरुड रस्त्यावर बोर्ली स्टँडनजीक एक रस्ता मांडला,काकळघर कडे तर दुसरा मुरुड कडे जातो.याठिकाणी कित्येक दिवसांपासून खाच-खळगे व खड्डे पडले असून वाहनचालक व स्थानिक नागरिकांना त्रास व हाल सहन करावे लागत आहेत. नुकत्याच दोन तीन दिवस पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे रस्त्याच्या दुरावस्थेत भर पडली आहे. शासनाच्या संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकारी वर्गाने यात लक्ष पुरवून बोर्ली स्टँडनजीक रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात यावेत. अशी मागणी वाहनचालक व नागरिकांतून होत आहे.

## कुस्तीगीरांना तालमीसाठी भूखंड आरक्षित करून आखाडा तयार करा : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कुस्तीगिरांना तालमीसाठी भूखंड आरक्षित करून आखाडा तयार करण्याची मागणी पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी पालिकेचे आयुक्त सुधाकर देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



पनवेल तालुक्याला कुस्तीगिरांची मोठी परंपरा लाभलेली आहे. अनेक गावात पैलवान तयार होत आहेत. तालुक्यातील ग्रामीण भागातील तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शहरात सरकारी तसेच खाजगी आस्थापनांमध्ये कार्यरत असणारे अनेक पैलवान आहेत. मात्र स्थानिक पातळीवर तालमीसाठी जागा नसल्याने यातील पैलवानांची गैरसोय होत असल्याने अनेकजण सांगली व कोल्हापूर येथील तालमीत जाऊन सराव करतात. त्यामुळे स्थानिक पातळी-वर सिडकोच्या माध्यमातून तालमीसाठी जागा उपलब्ध झाल्यास आपल्या पैलवानाची होणारी गैरसोय दूर होईल. असे मत प्रितम म्हात्रे यांनी व्यक्त केले आहे.

तालमीसाठी भूखंड आरक्षित करून आखाडा तयार केल्यास पनवेल मधून देखील अनेक कुस्तीगिर तयार होतील आणि पनवेलचे नाव उंचावेल. पनवेलच्या ग्रामीण भागात अजूनही कुस्ती शौकिनांची संख्या मोठी आहे. कुस्तीतून अनेक चांगले खेळाडू तयार होत आहेत. त्यामुळे त्यांच्या तालमीसाठी भूखंड आरक्षित करून आखाडा तयार करण्याची गरज आहे. या कुस्तीगिरांना पालकांचे देखील मोठे पाठबळ मिळत आहे. कुस्तीच्या खेळाला प्रेक्षकांचा देखील मोठा प्रतिसाद मिळतो. कुस्तीगिरांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले आहे.

## न्हावा शिवडी सागरी सेतू बाधित मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी २९ जानेवारीला मोर्चा

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

न्हावा शिवडी सागरी सेतू बाधित मच्छीमार बांधवांना नुकसान भरपाई मिळविण्यासाठी न्हावा, गव्हाण, घारापुरी ग्राम पंचायत हद्दीतील ग्रामस्थांचा चचठऊ- च्या कोपर येथील टाटा कंपनी चे प्रोजेक्ट वर शुक्रवार दिनांक २९ जानेवारी रोजी सकाळी ठीक ९ वाजता काम बंद आंदोलन करण्याचा निर्णय गव्हाण भागातील सर्व पक्षीय संघर्ष समिती ने एक मताने घेतलाा असल्याची माहिती व्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच जितेंद्र म्हात्रे यांनी दिली आहे.

यावेळी गव्हाण सरपंच सौ स्नेहलता भगत मॅडम, घारापुरी चे सरपंच बळीराम ठाकूर, न्हावा ग्राम सुधार मंडळ अध्यक्ष आशिष पाटील, हनुमान भोईर माजी सरपंच न्हावा, वसंत म्हात्रे माजी सरपंच गव्हाण, चंद्रकांत शेठ भोईर, न्हावा, तंटा मुक्ती समिती अध्यक्ष प्रदीप ठाकूर, न्हावा उप सरपंच सौ साधना तांडेल गव्हाण उप सरपंच सचिन घरत, घारापुरी उप सरपंच सचिन म्हात्रे न्हावा माजी उपसरपंच किसन पाटील, सागर शेठ ठाकूर, हरिश्चंद्र म्हात्रे , न्हावा शाखा प्रमुख हरेश्र्वर म्हात्रे, कोपर चे ग्राम पंचायत सदस्य विजय घरत, सौ माई भोईर तसेच हेमंत ठाकूर गव्हाण, कोपर चे चंद्रकांत घरत, गौरव म्हात्रे खाडी चे सी एल ठाकूर यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## शहीद वीर यशंवतराव घाडगे यांचे माणगांवात स्मारक उभारणार : ना. आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

शहीद वीर यशवंतराव घाडगे व्हिक्टोरीया क्रॉस मानचिन्हधारक (मरणोत्तर) यांचा जयंती उत्सव प्रांत कार्यालय माणगांव वीर यशवंत घाडगे पुतळा परीसरात पार पडला. यावेळी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री व राज्यमंत्री आदिती तटकरे व रत्नागिरी रायगड लोकसभेचे खासदार सुनिल तटकरे यांनी देखील व्हिक्टोरिया क्रॉस विजेते शहीद वीर यशवंतराव घाडगे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पूण मानवंदना दिली.

नाम. आदिती तटकरे यांच्या कारकिर्दीतील सर्वात पहीला आमदार निधी सुमारे १५ लाख निधी हा वीर यशवंतराव घाडगे यांच्या स्मारकासाठी दिला. गतवर्षी मंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर याच उत्सवासाठी

माणगांव येथे पहिल्यांदा आल्याची आठवण सांगताना या परिसरात भावी पिढीकरीता प्रेरणादायी ठरेल असे भव्यदिव्य स्मारक लवकरच उभारणार व त्या कामाचे भुमीपुजन यावर्षी वीरपत्नी लक्ष्मीबाई घाडगे यांच्या हस्ते होणार ! असे विश्वासात्मक वक्तव्य नाम. आदिती तटकरे यांनी याप्रसंगी आपल्या मनोगतात ठामपणे व्यक्त केले आहे.

हा उत्सव सरकारी प्रशासन व माजी सैनिक संघटनेने आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी भूषविले असून शहीद वीर यशवंतराव घाडगे याच्या पत्नी लक्ष्मीबाई घाडगे व त्यांचे कुटुंब, माणगांव नगराध्यक्षा योगीता चव्हाण, पं. स. सभापती अल्का जाधव, प्रांताधिकारी प्रशाली दिघावकर, तालुका रा. कॉ. अध्यक्ष सुभाष केकाणे, संगीता बक्कम, .../२

# महासत्तेतले मस्तवाल

ऐन मध्यरात्री एखाद्या सरदाराच्या भाडोत्री बाजिंद्यांनी महालात घुसून सुलतानाला ठार करावे आणि पहाटे नव्या सुलतानाच्या नावाची द्वाही फिरवावी, अशा मध्ययुगातल्या कथांप्रमाणे एकविसाव्या शतकातही मावळत्या महासत्तेत घडते आहे. साऱ्या जगाला शिस्त लावण्याचा, जगाचा नकाशा हवा तसा बदलण्याचा ठेका ज्यांच्याकडे आहे; त्यांच्या सर्वोच्च प्रतिनिधीगृहांच्या परिसरात नुसती बेदिली माजली नाही, तर एका पोलिस अधिकाऱ्यासहित पाच जण मारले गेले आहेत. वॉशिंग्टनमधील ' कॅपिटॉल' या संसदभवनात डोनाल्ड ट्रम्प यांच्या समर्थकांनी जो नंगानाच घातला आणि लोकशाहीचे जे धिंडवडे काढले, त्याला सर्वस्वी त्यांचा 'डॉन'च जबाबदार आहे. अमेरिकेत औपचारिक सत्तांतर होण्यास अजून दहा-अकरा दिवस असले, तरी अमेरिकी प्रतिनिधीगृहांनी आपले विशेष अधिकार वापरून, ट्रम्प यांचे अध्यक्षपद खेचून घेतले पाहिजे. खरे तर, त्यांचे पाठिराखे ज्या प्रकारे हल्ल्याची भाषा करीत होते, ती पाहता ट्रम्प यांच्यावर राजद्रोहाचाच खटला भरला गेला पाहिजे. त्यांची ताबडतोब सार्वजनिक जीवनातून कायमची गच्छन्ती व्हायला हवी. आपल्याच अध्यक्षांचे समर्थक आपल्यावर चालून येतील, अशी कल्पना अमेरिकी संसदेतील सुरक्षा रक्षकांनी स्वप्नातही केली नसेल; त्यामुळे आरंभी त्यांचा प्रतिसादही आंदोलकांना सौम्यपणे हाताळण्याचा होता. हे सशस्त्र हल्लेखोर 'काँग्रेस'च्या बैठकीत घुसले असते, तर अनवस्था प्रसंग ओढवला असता. अनेकांच्या हातात पिस्तुले होती. ते ती नाचवत होते. सिनेटच्या शंभर सदस्यांपैकी दोन जागांवर जॉर्जियातून डेमॉक्रॅटिक उमेदवार नुकतेच जिंकल्याने, तेथील बलाबल हे रिपब्लिकन ५० आणि डेमॉक्रॅटिक ५० असे समतुल्य झाले. कमला हॅरिस यांच्याकडे सभागृहाच्या सभापती या नात्याने निर्णायक मत आहे. याचा अर्थ, प्रतिनिधी गृह आणि सिनेट या 'काँग्रेस'च्या दोन्ही सभागृहांमध्ये नव्या अध्यक्षीय नावावर शिक्कामोर्तब होणे, ही औपचारिकता बनली होती. ट्रम्प यांचे डोके जॉर्जियातील निकालांमुळे फिरलेले दिसते. अध्यक्षीय निकाल जाहीर झाल्यानंतर आणि निवडणूक आयोगाने जो बायडेन यांना विजयी घोषित केल्यानंतर, एका निसरड्या निवेदनाचा अपवाद वगळता डोनाल्ड ट्रम्प यांनी एकदाही आपला पराभव खिलाडूपणे मान्य केला नाही. आता इतका तमाशा झाल्यानंतर मात्र ट्रम्प सत्तांतर शांततेत होईल, असे शहाजोगपणे सांगत आहेत. लोकशाही मार्गाने सत्ता मिळवणाऱ्या नेत्यांची लोकशाहीची प्रक्रिया आणि लोकशाहीतील सर्वोच्च संस्था यांच्याबद्दलची आस्था किती ठिसूळ व विसविशीत असू शकते, याचे उद्विग्न करणारे चित्र ट्रम्प यांच्या वर्तनाने जगासमोर आले आहे. केवळ लोकशाही असणाऱ्याच नव्हे, तर लोकशाही असावी असे वाटणाऱ्या देशांमधील समाजांचेही डोळे अमेरिकेकडे लागलेले असतात. गेली चार शतके तेथील लोकशाही विकसित होत आली आणि जोडीने अभूतपूर्व आर्थिक विकास होत राहिला. या साऱ्या पुण्याईवर ट्रम्प यांच्या निवडीनेच शिंतोडे उडायला सुरुवात झाली होती. चार वर्षे बेबंद, बेछूट आणि मस्तवाल वर्तन करून, ट्रम्प यांनी स्वत:च्या कारकिर्दीची अखेरही तितकीच घृणास्पद करून घेतली आहे. अध्यक्षीय निकाल लागल्यानंतर ट्रम्प समर्थकांनी विविध राज्यांच्या मुख्य न्यायालयांमध्ये आधी दाद मागितली. त्या सर्व याचिका फेटाळून लावल्या गेल्या. शेवटी, सर्वोच्च न्यायालयातही ट्रम्प यांची याचिका टिकली नाही. इतके होऊनही, 'कॅपिटॉल'मधील हिंसाचार होण्याच्या आधी डोनाल्ड ट्रम्प यांनी जे भाषण केले, ते अमेरिकेतील एकाही संस्थेवर म्हणजे, संसद, न्यायालये, निवडणूक आयोग यांच्यावर विश्वास व्यक्त करणारे नव्हते. सुदैवाने, ट्रम्प हे वेडाचार करीत असले, तरी रिपब्लिकन पक्षातील इतर प्रमुख नेत्यांनी अक्कल गहाण टाकली नाही आणि 'काँग्रेस'च्या दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरळीत पार पाडण्यात आले; मात्र उद्या बायडेन यांनी शपथ घेतल्यावर लगेच ट्रम्प यांचा प्रभाव संपणार नाही. ट्रम्प यांनी गेली चार वर्षे सातत्याने अमेरिकी समाजात विविध निमित्तांनी आणि वेगवेगळे काल्पनिक शत्रू उभे करून विषपेरणी केली आहे. वॉशिंग्टनमध्ये ट्रम्प समर्थकांचा उन्माद त्यातूनच आला होता. या उन्मादाला कृष्णद्वेषापासून गैर अमेरिकींच्या तिरस्कारापर्यंत अनेक रंग आहेत. ते यापुढच्या काळात दिसत राहिले, अमेरिकेत जागोजाग छोटे-मोठे विद्वेषी उद्रेक होत राहिले, तर आश्चर्य वाटायला नको. तितके सुरुंग तर ट्रम्प यांनी नक्कीच पेरले आहेत. या देशाचा आणि समाजाचा भाग्यविधाता मी सोडून दुसरा कुणीही असूच शकत नाही, ही मनोरुग्णता असते. याच मनोरुग्णतेने हिटलरसहित साऱ्या हुकूमशहांना ग्रासले होते. देखावा लोकशाहीचा असला, तरी ट्रम्प हेही याच मानसिक आजाराने ग्रस्त आहेत. थोड्या दिवसांनी त्यांचा कार्यकाळ संपेल; मात्र ट्रम्प यांनी केवळ अमेरिकेवर नव्हे, तर साऱ्या जगातील लोकशाहीवर खोल घाव घातले आहेत. असे आपल्याकडे कधीही होऊ नये, याची चिंता आता जगातील सगळ्यांत मोठ्या लोकशाही देशाने करायला हवी. ट्रम्पासुराचा खरा धडा तो आहे.

# ..तर मुलींच्या खात्यात २५ हजारांचे अनुदान जमा होणार

**दै.रायगड नगरी । तळा**

राज्यात मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी शासनाच्या वतीने एकात्मिक बालविकास सेवा योजनेनुसार माझी कन्या भाग्यश्री (सुधारित) योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार एका मुलीच्या जन्मानंतर मुलीच्या माता पित्याने कुटुंनियोजन शस्त्रक्रिया केल्यास मुलीच्या खात्यात ५० हजार रुपये आणि दोन मुलींच्या जन्मानंतर कुटुंनियोजन शस्त्रक्रिया केल्यास मुलीच्या खात्यात प्रत्येकी २५ हजारांचे अनुदान वर्ग केले जात आहेत.

रायगड जिल्ह्यात या योजनेची अत्यंत प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने सुधारित माझी कन्या भाग्यश्री योजने अंतर्गत २०८ लाभार्थी मुलींच्या खात्यात ५२लाख रुपयांचे अनुदान वर्ग करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक यांनी दिली आहे.

मुलींचा जन्मदर वाढविणे, लिंग निवडीस प्रतिबंध करणे, मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन तथा खात्री देणे, मुलींच्या आरोग्याचा दर्जा वाढविणे या प्रमुख हेतूने माझी कन्या भाग्यश्री (सुधारित) योजना २०१६/१७मध्ये राबविण्यास राज्यात सुरुवात करण्यात आली. त्यानुसार रायगड जिल्ह्यात आत्तापर्यंत जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने २०८ लाभार्थी मुलींना अनुदान वाटप करण्यात आले आहे.

आणखी४० प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे प्राप्त असून त्यांच्यावर कार्यवाही सुरू असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक यांनी दिली आहे. तसेच या योजनेअंतर्गत अनुदान मिळण्यासाठी पात्र कुटुंबांनी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

मुलींचा जन्मदर वाढविणे, लिंग निवडीस प्रतिबंध करणे तसेच इतर उद्दिष्टाने परिपूर्ण अशी माझी कन्या भाग्यश्री योजना आहे. एक किंवा दोन मुलींच्या जन्मानंतर माता पित्याने कुटुंबनियोजन शात्रक्रिया केल्यास मुलींच्या खात्यात अनुदान जमा केले जात आहे. रायगड जिल्हा परिषद ही योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष लक्ष देण्यात येत आहे. आत्तापर्यंत य योजनेतंर्गत ५३ लाख रुपयांचे अनुदान मुलींच्या खात्यात वर्ग करण्यात आले आहे.

योजनेच्या अटी व नियम पहिले आपत्य मुलगा आणि नंतर मुलगी किंवा पहिले अपत्य मुलगी आणि नंतर मुलगा झाल्यास लाभ घेता येणार नाही. लाभार्थी मुलीचे वडिल महाराष्ट्र राज्याचे मूळ रहिवासी असणे आवश्यक आहे. लाभ घेण्यासाठी मुलीचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. दुसर्या प्रसुतीच्या वेळी जुळ्या मुली झाल्या तर त्या योजनेस पात्र असतील. विहीत मुदतीपूर्वी मुलीचा विवाह झाल्यास किंवा दहावीपूर्वी तिने शाळा सोडल्यास, नापास झाल्यास या योजनेचा फायदा मिळणार नाही. मुलीचा नैसर्गिक कारणाने मृत्यु झाल्यास मुलीच्या नावे गुंतविण्यात आलेली रक्कम तिच्या पालकांना मिळेल. प्रत्येक लाभार्थी मुलीसाठी स्वतंत्र खाते बँकेत उघडण्यात येणार आहे. स्थानिक तहसिलदाराकडून उत्पन्नाचा दाखल मिळणे आवश्यक आहे. पात्र कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ७.५० लाखांपेक्षा कमी असावे.अशी माहिती प्रसिद्धीसाठी देण्यात आली आहे.

# जितू गायकवाड यांची अप्रतिम कलाकृती : कुंचल्यातून साकारले माथेरानच्या राजकीय पटलावरील मुख्य केंद्रबिंदू प्रसादभाई सावंतांचे चित्र

**दै.रायगड नगरी । माथेरान**



चित्रावरून चरित्राची ओळख निर्माण होत असते आणि याच चरित्रावरून चरित्रात्मक अंगीकृत असणारी संपूर्ण जीवनशैली आणि त्या व्यक्तीचा जीवनपट सुध्दा आपसूकच नजरेसमोर रेखांकित होत असतो. याच धर्तीवर पेणचे सुप्रसिद्ध चित्रकार जितेंद्र (जितू )चंद्रकांत गायकवाड ज्यांनी अनेक पारितोषिक चित्रकारिता क्षेत्रांत नैपुण्यपूर्वक कामगिरी करून पटकावली आहेत. त्यांच्या अद्वितीय आणि अदभूत कलेला दाद परदेशात सुध्दा मिळालेली असून अनेक परदेशी व्यक्तींच्या मागणीनुसार आणि आवडीप्रमाणे अनेक पेंटिंग (चित्रे)आपल्या कुंचल्यातून रेखाटून दिली आहेत. मूळचे पेण (रायगड) येथील जितू गायकवाड यांनी हृषीकेश चित्रकला महाविद्यालय पनवेल येथे चित्रकलेचे धडे गिरवले असून जे.जे. स्कुल ऑफ आर्ट मध्ये डिग्री घेतली आहे. आतापर्यंत त्यांनी एकूण ३२ वेळा वैयक्तिक आणि समूह चित्रप्रदर्शनमुंबई पुण्यासारख्या नामवंत गॅलरीत भरविले असून चित्र प्रेमींकडून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला आहे.

माथेरान वर विशेषतः प्रेम असणारे जितू यांनी नुकताच येथील नगरपरिषदेचे गटनेते तथा बांधकाम सभापती प्रसादभाई सावंत यांचे हुबेहूब चित्र रेखाटून प्रसादभाई सावंत यांना भेट स्वरूपात दिले आहे. याबाबत त्यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, माथेरान मधल्या आजवरच्या राजकीय घडामोडीत उल्लेखनीय कामगिरी आणि निस्वार्थीपणाने कामे तडीस नेणारे प्रसादभाई सावंत हे खरोखरच एकमेव उत्तम नेतृत्व माझ्या दृष्टीक्षेपात आले असल्याने सावंत यांनी अल्पावधीतच आपला ठसा राजकीय क्षेत्रात उमटवला आहे. तरुण वयात त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत असताना त्याला राजकारणाची जोड देऊन अनेक महत्वाकांक्षी कामे पूर्णत्वास नेली आहेत. आणि नगरपरिषदेत एकहाती सत्ता स्थापन करून देखील या व्यक्तीचे पाय आजही जमिनीवर आहेत. नेहमीच गराजवंतांना सढळ हाताने मदत करून युवा पिढीला क्रीडा क्षेत्रात पाय रोवण्यासाठी स्वखर्चाने डे नाईट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा भरवून इथल्या नवोदित खेळाडूंच्या कलेला वाव देण्यासाठी प्रेक्षकांसमोर आणून पुढाकार घेत आहेत. त्यामुळेच युवा वर्ग त्यांच्याकडे मोठया प्रमाणावर आकर्षित होत आहे. कष्टकरी लोकांना सुध्दा नेहमीच मदत आणि माथेरान मधील अनेक क्रिकेटची मंडळे क्रिकेटच्या स्पर्धा आयोजित करतात त्यावेळी त्यांना प्रसादभाई हेच आवर्जून सढळ हस्ते मदत करतात त्यामुळेच अनेक क्रिकेट स्पर्धा येथील मंडळे भरवीत असतात. हे सर्व गुण प्रसादभाई यांच्याकडे असल्याने मला त्यांचे एखादे चित्र निर्माण करून त्यांना भेट स्वरूपात द्यावे ही माझी इच्छा होती. माथेरानच्या राजकीय पटलावरील मुख्य केंद्रबिंदू समजले जाणा-या प्रसादभाई सावंतांचे चित्र माझ्या कुंचल्यातून रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. असे जितू गायकवाड यांनी सांगितले. हे चित्र प्रसादभाईंना देताना जितू गायकवाड यांच्या सोबत क्षत्रिय मराठा समाजाचे अध्यक्ष प्रवीण सकपाळ, वनसंरक्षक समितीचे उपाध्यक्ष राजेंद्र कदम, वनसंरक्षक समितीचे माजी अध्यक्ष गिरीश पवार, सामाजिक कार्यकर्ते शैलेश चाफेकर, विजय कदम आदी उपस्थित होते.


दैनिक रायगड नगरी जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# म्हसळा तालुका क्रीडा संकुलाची पालकमंत्र्यांकडून पाहणी, फेब्रुवारीमध्ये लोकार्पण

**दै.रायगड नगरी । म्हसळा**



तालुका तेथे क्रीडा संकुल, आयटीआय, ग्रामीण रुग्णालय अस-ावे या करिता आघाडी शासनाच्या ध्येय धोरणानुसार सन १९१४-१५ मध्ये तत्कालीन पालकमंत्री, विद्यमान खासदार सुनिल तटकरे यांनी म्हसळा तालुक्यात अद्ययावत क्रीडा संकुल तयार करण्यासाठी ६० लक्ष रुपये खर्चाचे बांधकामास मंजुरी दिली आणि म्हसळा सावर हद्दीतील शासकीय भूखंडावर प्रस्तावित संकुलाचे खासदार सुनिल तटकरे यांनी भूमिपूजन करून कामाला सुरुवात केली होती. मागील ५ वर्षे शासकीय निधी अभावी म्हसळा क्रीडा संकुल बांधकामाचे काम रखडले होते. मात्र आता कामाला गती मिळाली आसुन हे क्रीडांगण सर्व त्या सोयीनुसार परिपुर्ण व्हावे म्हणून खासदार तटकरे यांच्या पावलावर पाऊल ठेवत महाराष्ट्र राज्य क्रीडा मंत्री, रायगड जिल्हा पालकमंत्री आदिती तटकरे यांनी या क्रीडा संकुलाचे वाढीव बांधकामास शासन स्तरावर आणखी २० लक्ष रुपये मंजुर केले असल्याचे सांगितले.आता या कामाला खऱ्या अर्थाने गती मिळाली आहे. त्यामुळे येत्या महिन्यात या संकुलाचे काम पुर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

दिनांक ८ जानेवारी २०२१ रोजी पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या म्ह-सळा तालुका दौऱ्यावेळी त्यांनी शासकीय अधिकारी आणि तालुका पदाधिकारी यांच्या समावेत क्रीडा संकुलाचे बांधकामाची पहाणी केली असता संकुलाच्या होत असलेल्या बांधकामा बाबत समाधान व्यक्त करून माहे जानेवारी अखेर पर्यंत क्रीडा संकुलाचे काम पुर्ण करावे अशा संबंधितांना सुचना करतानाच माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये म्हसळा तालुका क्रीडा संकुलाचे उद्घाटन करण्यात येईल असे आश्वाशीत केले. या वेळी त्यांचे समावेत तालुका अध्यक्ष समीर बनकर, सभापती उज्वला सावंत, माजी सभापती नाझीम हसवारे, नगराध्यक्षा जयश्री कापरे, उपनगराध्यक्ष सुहेब हलदे, प्रांत अधिकारी समीर शेटगे, गटविकास अधिकारी वाय. एम.प्रभे, बांधकाम अभियंता एस.व्ही.गणगणे, तालुका क्रीडा अधिकारी वांजळे, उप अभियंता आर.टी. जेटे, शहर अध्यक्ष रियाज घराडे, भाई बोरकर, नासिर दळवी, नईम दळवी, मुबिन हुर्जुक आदी मान्यवर उपस्थित होते.

# जेएनपीटीमध्ये सतत वातावरणीय वायु गुणवत्ता निरीक्षण केंद्र सुरू

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

भारताचे प्रमुख कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) ने पर्यावरणासंबंधी उद्दिष्ट प्राप्ति व हरित बंदर बनण्याच्या दृष्टीने पोर्ट ऑपरेशन सेंटर येथे 'सतत वातावरणीय वायु गुणवत्ता निरीक्षण केंद्र' (सीएएक्यूएमएस) सुरू केले आहे. जेएनपीटीचे चेअरमन संजय सेठी, भा.प्र.से. यांनी या केंद्राचे उद्घाटन केले. याप्रसंगी पोर्टचे व्हा चेअरमन उन्मेष शरद वाघ, भा.रा.से, सीव्हीओ ए.एस. रामटेके (आयआरआरएस), आयआयटी मद्रासचे प्रोफेसर प्रा.शिवा नागेंद्र आणि जेएनपीटीचे विभागाध्यक्ष उपस्थित होते.

नुकत्याच सुरू झालेल्या या केंद्रामध्ये (सीएएक्यूएमएस स्टेशन) पार्टिक्युलेट मॅटर (१०, आणि २.५), सल्फर डायऑक्साइड (एसओ २), नायट्रोजन डायऑक्साइड (एनओ २), अमोनिया (एनएच ३), ओझोन, कार्बन कार्बन मोनोऑक्साइड (उज), नाइट्रोजन डाइऑक्साइड (छज) और वोलटाइल ओरगॅनिक कंपाउण्ड्स (तजऊी) सारख्या रिअल टाईम एअर क्वालिटी पॅरामीटर्सचे निरीक्षण केले जाईल. याशिवाय तापमान, पाऊस, हवेतील आर्द्रता, सौर किरणे, वा-याचा वेग व दिशा यासारख्या हवामानाशी निगडित ६पॅरामीटर्सचे देखील या केंद्रामध्ये निरीक्षण केले जाईल. या केंद्रामध्ये रिअल-टाइम सतत वायु गुणवत्ता माहिती देखील एकत्रित केली जाईल, जी मोठ्या स्क्रीनद्वारे लोकांना दाखविण्यात येईल तसेच सामान्य लोकांना ही माहिती उपलब्ध व्हावी यासाठी ही माहिती जेएनपीटीच्या वेबसाइटवर देखील प्रदर्शित केली जाईल. बंदरातील वास्तवीक वायु गुणवत्तेची स्थिती जाणून घेण्यासाठी सुरू केलेल्या या 'सतत वातावरणीय वायु गुणवत्ता निरीक्षण केंद्राचे' संचालन व देखभाल इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी), मद्रास द्वारे केले जाईल. जेएनपीटी मध्ये राष्ट्रीय वातावरणीय वायु गुणवत्ता मानकानुसार (नॅशनल एम्बियंट एअर क्वालिटी स्टॅंडर्ड) हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण केले जात आहे आणि बंदरातील अनेक ठिकाणच्या हवेच्या गुणवत्तेची स्वयंचालित माहिती उपलब्ध होण्यासाठी सेंसर-आधारित हवा गुणवत्ता निरीक्षण उपकरणे बसविण्यात आली आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

# शिवसेना सोडणाऱ्यांना दुसरीकडे करमत नाही

विकासकामे या परिसरात सुरू होणार आहेत, अशी ग्वाही दिली.

प्रारंभी तालुकाप्रमुख निलेश अहिरे यांनी, तुर्भे पंचक्रोशी शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून कायम राहणार असल्याचे ठाम मत व्यक्त केले. यावेळी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी, तुर्भे पंचक्रोशीत एमआयडीसी आणण्यासंदर्भात मोठया प्रमाणात प्रयत्न सुरू असून तालुक्यातील मतदार संख्येनुसार मतदानाची आकडेवारी वाढल्याखेरिज विकास होणार नसल्याने लॉकडाऊननंतर रोजगार गमावलेल्यांना तालुक्यात पुन्हा रोजगार संधी निर्माण करण्याची गरज असल्याचे सांगून गेल्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये मिळालेले मताधिक्य घटणार असले तर नेतृत्व कुठेच कमी पडले नसताना असे का होते, असा प्रश्न उपस्थित होतो, असा सवाल केला.

पुणे येथील हॉटेल व्यावसायिक व तुर्भे येथील सुपुत्र अनिल गोळे यांच्या शिवसेना पक्षात प्रवेशावेळी आ. भरत गोगावले यांनी हाती भगवा देऊन स्वागत केले.

याप्रसंगी ज्ञानेश्वर बाबाजी वाडकर, गणपत गोळे, विष्णू गोळे, नारायण गोळे, पांडुरंग गोळे, रुपेश गोळे, रमेश गोळे, सिताराम मोरे, कृष्णा मोरे, हरिश्चंद्र कोंडाळकर, सचिन गोळे, शिवराम गोळे, सावित्री वाडकर, प्रथमेश गोळे, रितेश गोळे, दिपेश गोळे, सुनील गोळे, स्मिता वाडकर, विठाबाई गोळे, पुष्पा गोळे, मुक्ता गोळे, नैना गोळे, जयश्री गोळे, जयश्री गोळे, संगिता गोळे, अलका मोरे, नलीनी कोंडाळकर, जनाबाई मोरे, सविता गोळे, सुनिता गोळे, सुरेखा गोळे, शेवंती गोळे, बाबू गोळे, अशोक शेलार, सुवर्णा शेलार, किरण गोळे, रामचंद्र गोळे, अक्षय गोळे, बाबाजी वाडकर, लक्ष्मीबाई वाडकर, लक्ष्मी गोळे, जयवंती गोळे, विठाबाई झाडगे, सईबाई गोळे, प्रकाश गोळे, रंजना गोळे, विठाबाई गोळे, शशिकांत गोळे, दिपाली गोळे, शरद गोळे, निलिमा गोळे, विठोबा गोळे व विठ्ठल गोळे आदींनी शिवसेनेत प्रवेश केला.

# माणगांवात स्मारक उभारणार : ना. आदिती तटकरे

पं. स. सदस्य शैलेश भोनकर, माणगांव नगरपंचायत नगरसेवक, जिल्हा सैनिक आधिकारी शेख व शासकीय अधिकारी, माजी सैनिक व नागरिक कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमानिमीत्त तालुक्यातील विविध शाळेत चित्रकला व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते व त्याचे बक्षीस वितरणही पालकमंत्री यांच्या हस्ते केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन काप मॅडम तर प्रास्ताविक प्रांत कार्यालयाचे कर्मचारी राकेश सावंत यांनी केले.

व्हिक्टोरीया क्रॉस विजेते शहीद वीर यशंवतराव घाडगे यांचा जन्म माणगांव तालुक्यातील पळसगांव (आंब्रे वाडी) येथे सन १९१९ मध्ये गरीब शेतकरी कुटूंबात झाला. वयाच्या ११ वर्षी पळसगांव येथील मराठी शाळेत त्यांनी ४ थी पर्यंतचे शिक्षण घेतले.

वयाच्या १८ व्या वर्षी सन १९३७ साली विरपत्नी लक्ष्मीबाई घाडगे यांच्याशी त्यांचा विवाह झाला. सन १९३८ साली मराठा लाईट इन्फ्रंन्ट्री मध्ये शिपाई म्हणून दाखल झाले. इटलीमध्ये ब्रिटीश सैन्याबरोबर पाचवी मराठा लाईट इन्फ्रंन्ट्री लढतीमधील फौजेत यशवंतराव घाडगे हे नाईक म्हणून काम पहात होते.

इटलीमधील युध्दात आपल्या हाताखालच्या सैनिकांसह जर्मन सैनिकांवर चाल करुन जात असताना, सर्व सैनिकांना वीर मरण आले. शेवटी यशवंतराव घाडगे हे एकटेच उरले. आपल्या प्राणाची पर्वा न बाळगता शत्रुवर गोळीबार चालू ठेवून सर्व जर्मन सैनिक त्यांनी कापून टाकले. दि. १० जुलै १९४४ रोजी लढता-लढता शत्रुची गोळी छातीत लागून त्यांच्या पवित्र प्राणांची ज्योत अनंतात विलीन झाली. यशंवतरावाच्या या कामगिरीचा गौरव करण्यासाठी त्यांच्या पश्चात, लश्करातील अत्युच्य अशा बहुमानाचे प्रतिक म्हणजे व्हिक्टोरीया क्रॉस हिंदुस्तानाची राजधानी दिल्ली येथे लाल किल्लयासमोर बाहेरील खुल्या मैदानात हिंदुस्तानचे व्हॉईसरॉय व गव्हर्नर जनरल फील्ड मार्शल लॉर्ड वेव्हेल यांचे हस्ते दि. ३ मार्च, १९४५ रोजी शूर वीर यशवतंराव घाडगे यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यशवंतराव घाडगे यांना अर्पण करण्यात आला.

वीर यशवंतराव घाडगे यांची स्मृती कायम रहावी म्हणून रायगड जिल्हयातील माणगांव मामलेदार कचेरी जवळ त्यांचा कायमचा पुतळा उभारण्यात आला आहे. वीर यशवंराव घाडगे यांच्या शौर्यस्मृती चिरंतन रहावी म्हणून माणगांव तहसिल कार्यालयामार्फत दरवर्षी ९ जानेवारी रोजी त्यांचे कुटूंबिय, लोकप्रतिनीधी, प्रतिष्ठीत नागरीक व शाळा-कॉलेज मधील विद्यार्थी तसेच माणगांव, महाड, पोलादपूर, रोहा, म्हसळा, तळा या तालुक्यातील आजी माजी सैनिकांच्या उपस्थितीत मोठया प्रमाणात घाडगे उत्सव साजरा करण्यात येतो.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## बेकादेशीर बांधकामासह व्यवसायिकांविरुद्ध सिडकोची धडक कारवाई



**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मधील ओवेगाव मध्ये सिडको मालकीच्या भूखंडावर बांधण्यात येणारे सिमेंट कॉंक्रीटीकरण सुरु असलेले घर सिडको द्वारा जमीनदोस्त करण्यात आले. याशिवाय खारघर मधील सत्यसाई हॉस्पिटल समोरील अनधिकृत रस्ता आणि बेलपाडा गाव लगत पदपथावर बेकायदा व्यवसाय करणाऱ्या गॅरेज व्यवसायिकावर कारवाई करुन सिडको अधिकाऱ्यांनी गॅरेज मधील साहित्य जप्त केले. खारघर सेक्टर-३० मधील ओवेगाव लगत 'सिडको'च्या मोकळ्या भूखंडावर कब्जा करुन ओवे गावातील एका व्यक्तीने त्या भूखंडावर घराचे बांधकाम सुरु केले होते. याबाबत माहिती मिळताच 'सिडको'च्या मुख्य अनधिकृत बांधकाम नियंत्रक विभागाने 'सिडको'च्या मोकळ्या भूखंडावर बांधकाम सुरु असलेले घर जमीनदोस्त केले. याशिवाय केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल कार्यालय समोरील बाजूस रस्त्याचा कडेला अनधिकृत शेड उभारुन व्यवसाय करणाऱ्या जवळपास ४० भाजीपाला व्यावसायिकांवर कारवाई करुन त्यांचा भाजीपाला सिडको अधिकाऱ्यांनी जप्त केला. खारघर सेक्टर-४० मधील सत्यसाई हॉस्पिटल कडून रोहिंजण गावाकडे जाण्यासाठी तयार करण्यात आलेला अनधिकृत रस्ता रस्त्यावर जेसीबीद्वारे खड्डे खोदून बंद करण्याची कारवाई सिडको अधिकाऱ्यांनी केली. तसेच खारघर मधील उत्सव चौककडून भारती विद्यापीठकडे जाणाऱ्या मेट्रो पुलाखालील पदपथ अडवून पदपथ आणि रस्त्यावर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या गॅरेज व्यावसायिकावर सिडको द्वारे कारवाई करण्यात आली. २ पोकलन, १ जेसीबी, ३० कामगार आणि खारघर पोलीस यांच्या मदतीने सदर कारवाई 'सिडको'द्वारे करण्यात आली.

# नववर्षात खा.सुनिल तटकरे यांच्या हस्ते विकास कामांचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव नगरपंचायत हद्दीतील विविध विकास-कामांचे उदघाटन व भूमिपूजन नववर्षातील शनिवार दि.९ जानेवारी २०२१ रोजी रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. प्रत्येक प्रभागात खासदारांचे फटाक्यांच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी प्रसार माध्यमांजवळ बोलताना खासदार तटकरे यांनी माणगांवच्या विकासासाठी आपली बांधिलकी व्यक्त करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार चांगले काम करीत असल्याचे म्हटले आहे.



खासदार तटकरे यांच्या शुभहस्ते प्रभाग क्र.१ मध्ये उतेखोल आदिवासी वाडी, प्रभाग क्र.२ मध्ये दत्तनगर बुरुड समाज हॉल, प्रभाग क्र. ११ मध्ये निजामपूर रोड कालवा रोड, प्रभाग क्र. ४ मध्ये वाकडाई नगर, प्रभाग क्र. ८ मध्ये शिक्षक कॉलनी बंद पट्टे यांचे निवास, प्रभाग क्र. १० मध्ये उतेखोल वाडी (पोलीस स्टेशन मागील) स्मशानभूमी, प्रभाग क्र. ८ मध्ये इशरत प्लाझा, मंगलमूर्ती कॉम्प्लेक्स, प्रभाग क्र. ६ मध्ये कचेरी रोड, प्रभाग क्र. ५ मध्ये खैरे यांच्या घराजवळ, प्रभाग क्र. १३ मध्ये बालाजी कॉम्प्लेक्स उषा मेहता निवास, प्रभाग क्र. १३ मध्ये सरलादेवी मंगल कार्यालय रोड हायवे, प्रभाग क्र. १४ मध्ये पोस्ट ऑफिस रस्ता, प्रभाग क्र. १७ मध्ये जुने माणगांव बाजारटेप याठिकाणी रस्ते व अन्य विविध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेसच सरचिटणीस प्रभाकर उभारे, माणगांव तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष सुभाष केकाणे, माणगांव नगराध्यक्षा योगिता चव्हाण, माजी नगराध्यक्षा आनंदशेठ यादव, रायगड जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उपाध्यक्ष रवींद्र मोरे, माणगांव पंचायत समिती सदस्य शैलेश भोनकर, उपनगराध्यक्ष दिलीप जाधव, माणगांव शहर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष महामूद धुंदवारे, माणगांव तालुका महिला राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अध्यक्षा संगीता बक्कम, उपाध्यक्षा श्रद्धा यादव, शहराध्यक्षा स्मिता मिरजकर, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, उणेगाव सरपंच राजेंद्र शिर्के, नगरसेवक, नगरसेविका तसेच प्रभागातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोहा-तळा-श्रीवर्धन-हरिहरेश्वर बस सुरु करण्याची प्रवाशी व पर्यटकांची मागणी

**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन हरि हरेश्वर दिवेआगर पर्यटन स्थळ आहे तसेच हरिहरेश्वर हे तिर्थक्षेत्र (दक्षिण काशी) म्हणून ओळखले होते. या ठिकाणी अनेक हिंदू बांधव श्राद्ध(उत्तर कार्या)साठी नेहमी येत असतात. परंतु या ठिकाणीजाण्यासाठी एस् टी बस ची वानवा आहे.



त्यामुळे पर्यायाने खाजगी वाहनाचा वापर करावा लागत आहे.

तसेच पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. बस सैवा उपलब्ध नसल्याने अनेक पर्यटकात नाराजी दिसून येत असून रोहा तळा मार्गे श्रीवर्धन हरिहेश्वर नियमीत बस सुरु करण्याची मागणी जोर घरू लागली आहे. रोहा ते हरिहरेश्वर अंतर साधारणपणे रिटर्न १६०ते१९०कि.मी आहे रायगड विभागातुन श्रीवर्धन आगार सोडल्यास एखादी गाडी जाते अशी माहिती प्राप्त झाली आहे. रोहा येथून सदर मार्गावर बस सकाळी सात वा.सुटून तळा मांदाड वाशी मजगांव, म्हसळा, श्रीवर्धन, हरिहरेश्वर चालू केल्यास अनेक प्रवासी मिळून उत्तम उत्पन्न मिळेल. व प्रवाशी पर्यटक वर्गाची सोय होईल. बहुजन हिताय बहुजन सुखाय प्रशाशाच्या सेवे साठी एस.टी. महामंडळ हे ब्रिद वाक्य सार्थकी लागेल. तरी विभाग नियत्रंक पेण रामवाडी यांनी त्वरीत लक्ष घालून वरील बस सुरु करावी अशी प्रवासीसह पर्यटकांची मागणी आहे.

# खारघर परिसरातील तरुण व महिलांचा शिवसेनेत प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे व युवा सेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून खारघर परिसरातील शेकडो तरुणांनी तसेच महिलांनी भगवा ध्वज हाती घेवून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला असता त्यांचे स्वागत जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांनी केले.

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथे खारघर येथील युवकांचा व महिलांचा शिरीष घरत (शिवसेना जिल्हाप्रमुख-रायगड) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व नेतृत्वाखाली निझमुद्दीन मलिक, सेफी बबलू, ए शमशाद खान, समीम खान, तसेच युसूफ शेख यांच्या सह शेकडो युवकांचा व महिलांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश झाला. त्याप्रसंगी पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे, तालुका प्रमुख एकनाथ म्हात्रे, महानगर समन्वयक गुरूनाथ पाटील, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, खारघर शहर प्रमुख शंकरशेठ ठाकुर, ग्राहक कक्ष उपजिल्हा प्रमुख शशिकांत डोंगरे, महिला आघाडीच्या विधानसभा संघटिका सौ. रेवती सकपाळ, महानगर संघटिका, सौ.शुभांगी शेलार, पनवेल तालुका संघटिका सौ. सुजाता कदम , उपमहानगर संघटिका सौ. रिना पाटील, शिवसेना पदाधिकारी तसेच महिला आघाडी व युवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यातील तज्ञ शिक्षकांमार्फत विद्यार्थ्यांना ऑनलाईन अभ्यासक्रम

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र शाळा बंद करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आगामी शैक्षणिक प्रगतीचा आलेख खालावू नये यासाठी रायगड जिल्ह्यातील तज्ञ शिक्षकांमार्फत विद्यार्थ्यांना १ जानेवारी पासून ऑनलाइन अभ्यासक्रम मराठी विभाग डायट-पनवेल यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आला आहे. याचे आयोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल. आणि रायगड जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग यांनी केले आहे.

सायंकाळी ७ ते ८ दरम्यान शिक्षणाधिकारी आणि प्राचार्या यांच्यामार्फत Youtube आणि facebook द्वारे विद्यार्थ्यांनी live कनेक्ट होण्याचे आवाहन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल यांनी केले आहे. या ऑनलाइन पध्दतीने विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होणार असून परीक्षेच्या वेळी कोणत्याही प्रश्नांची उत्तरे अगदी सहजपणे सोपस्कार होऊ शकतात.सध्यातरी जवळपास सत्तर हजार विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येत आहे. याकामी मा.प्राचार्या चंद्रकला ठोके, भाऊसाहेब थोरात, शिक्षणाधिकारी (माध्य.), अधिव्याख्याता संजय वाघ, अधिव्याख्याता सुभाष महाजन, अधिव्याख्याता - रामदास टोने विषय सहाय्यक - हेमंत गोयजी, विषय सहाय्यक - सविता अष्टेकर, तांत्रिक जबाबदारी - विषय साहाय्यक - गणेश कुताळ, यांनी मेहनत घेतली.

नियोजन गेली २० दिवसांच्या पासून सुरू असून हे प्रशिक्षण १३ फेब्रुवारी पर्यंत असणार




आहे त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी यात आपला सहभाग नोंदवावा असेही संस्थेच्या वतीने आवाहन केले आहे. विशेष म्हणजे ह्या शिक्षण पद्धती साठी के.डी.पाटील(अलिबाग), संदीप घरत (अलिबाग), संघपाल वाठोरे (माथेरान), मंगेश कदम (म्हसळा), स्मिता भोईर (कर्जत), दिलीप पडळकर (पेण), बी.जी. शिकारे (अलिबाग), शलाका वेलणकर (पनवेल), प्रांजळ पाठक (पेण), संतोष कांबरी (कर्जत), सुनील खेडकर (पेण), वर्षा नाईक (अलिबाग) नरेंद्र म्हात्रे (पेण) हे तज्ज्ञ मार्गदर्शक लाभले आहेत.

# आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पती विरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एका इसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी गोविंद वरदाराम सिरवी (३२ रा.स्वस्तिक राधा सोसायटी, सेक्टर ३५, कामोठे) याने त्याची पत्नी मैना गोविंद सिरवी हिस दारु पिवून वारंवार तिला शिवीगाळ व मारहाण करून तसेच माहेरुन पैसे घेवून ये, पैसे आणले नाहीतर तुला नांदविणार नाही अशी धमकी देवून शारिरीक व मानसिक त्रास देवून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डिझेल चोरीच्या घटनांमध्ये वाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात उभ्या करण्यात येणाऱ्या ट्रक, ट्रेलर, टॅंकर आदींच्या टाकीमध्ये असलेले डिझेल चोरण्याचे प्रकार वाढीस लागले असून अशा डिझेल चोरांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी वाहन मालक व चालक करीत आहेत.

दिलीपकुमार हरिश्चंद्र मिश्रा यांचा ट्रेलर क्र.एमएच-४३-बीजी-५९९६ हा त्रिमुर्ती हॉटेल समोर पळस्पे येथे उभा करून ठेवला असताना अज्ञात चोरट्यांनी डिझेल टाकीचे किलोमीटर सेंन्सर व डिझेल लॉक तोडून टाकीतील जवळपास १९ हजार रुपये किंमतीचे २४० लीटर डिझेल काढून घेवून ते पसार झाले आहेत.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

**FORM-B**

(FORM OF NOTICE UNDER SECTION 11 OF ACT VIII OF 1890)

DISTRICT : RAIGAD

In the Court of District Judge at Panvel

PRESENT

CASE NO.56 OF 2020

Exh 9/D

Shri Arvind Kumar PETITIONER

Vs

Nobady

Inhabitant of India

Application for the Appointment of Guardian to Kum. Kiana Kumar Sundaram (Age 3 years) a minor under the age of 18 years. Daughter of decease Shri Kiran Sundaram (father) and of Mrs. Anamika Arvind (Mother) inhabitant of India.

Whereas the petitioner above named has applied to be appointed Shri. Arvind Kumar the guardian of the person of the aforesaid minor and the 18 day of March 2021 has been fixed for the hearing of the application; notice is hereby given to public that if any other relative, friend, kinsman or well-wisher of the aforesaid minor desire to be appointed or declared as guardian of the Miss. Kiana Kumar Sundaram of the said minor, or desire to oppose the application of the petitioner aforesaid, he should appear personally in the Court on the aforesaid date, and adduce any documentary and oral evidence in support of his claim to such appointment or declaration, or in support of his opposition to the application of the petitioner aforesaid.

Given under my hand and the seal of this Court, This day of 08/01/2021

Court Seal

Sd/-
Superintendant
District Court, Panvel

अर्जदारातर्फे वकील : ॲड.अनुराग ठाकूर

**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१५९/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.१८/०२/२०२१

श्रीमती.आशालता गणपत ठाकूर व इतर — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात कै.गणपत हिराजी ठाकूर यांचे वारस म्हणून वारसदाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. कै.गणपत हिराजी ठाकूर हे दिनांक १९/०९/२०२० रोजी मु.फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी मयत झाले आहेत. कै.गणपत हिराजी ठाकूर यांच्या मालकीच्या व ताबेकब्जा वहिवाटीच्या मौजे : फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी मयत झाले आहेत. कै.गणपत हिराजी ठाकूर यांच्या मालकीच्या व ताबेकब्जा वहिवाटीच्या मौजे : फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती सिडकोने संपादीत केल्या आहेत.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**

**मौजे : फुंडे, ता.उरण, जि.रायगड**

| गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे नं./हिस्सा नं. |
|---|---|---|
| फुंडे | १६६ अ/५०७ | १८/६ अ |
| फुंडे | ३९ अ/७५ | १२५/५ |
| फुंडे | ३९/६५ | ४३/४<br>६९/१९<br>७०/१९ |
| फुंडे | ३९/ड | १०/५ ब |

सदर मिळकतीच्या संपादनाच्या मोबदल्यात जेएनपीटी/सिडको कडून १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर मिळणाऱ्या भूखंडामध्ये कै.गणपत हिराजी ठाकूर ह्यांच्या मृत्यूनंतर त्यांची नावं कमी करून सदर भूखंडावर त्याचे वारस अर्जदार क्र.१) श्रीमती. आशालता गणपत ठाकूर २) श्री.प्रफुल्ल गणपत ठाकूर, ३) श्री.पंकज गणपत ठाकूर, ४) श्री.प्रशांत गणपत ठाकूर वरील १ ते ४ रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड ५) सौ.हर्षदा शशिकांत पाटील, रा.खांदा कॉलनी, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड हेच कायदेशीर वारस आहेत. ह्या वारसांची नावे त्यांच्या जागी सिडको दप्तरी रेकॉर्ड वर येणे गरजेचे झाले आहे. त्याकामी दिवाणी न्यायालयाकडून वारसदाखल्याचा निवाडा जाहीर करून घेणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे. सबब सदर कारणाकरिता अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालयात वारस दाखला मिळण्याकरिता सदरचा दि.चौ.अर्ज क्र.१५९/२०२० अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारस हक्काबाबत कोणाचीही हरकत अधिकार अथवा वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.०४/१/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, उरण

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, उरण

सिडको
शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**

**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे तरघर व मौजे उलवे ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मूळ भूधारक काना हरी भोईर यांचे कडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

| गावाचे नाव /संचिका क्र. | निवाडा क्र. | संपादित सर्व्हे क्र. / हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे. आर) | इरादित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| उलवे १२१९ | तरघर ११७ | १२/२<br>१४/२ | ०-३-८<br>०-९-८<br>०-०-३ | उलवे | २ | ३२ | २०० वाटपपत्र व करारनामा करण्यात आला आहे. |
| | तरघर १६९<br>उलवे २४५ | ७/४ पैकी<br>७/५ पैकी<br>५३/१ | ०-१०-५<br>०-५-५<br>०-४-१ | उलवे | १५ | A-१९-A | १०० इरादित |

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार साडेबारा टक्के योजने अंर्तगत **दि. १३/०७/२००७** रोजीच्या संगणकीय सोडतीद्वारे उलवे नोड येथे **भूखंड क्र.३२, सेक्टर-२, क्षेत्र २०० चौ.मी.** इरादित करून **दि. १५/०२/२००८** रोजी करारनामा करण्यात आला आहे. **(४३/प)** तसेच **दि. १९/०८/२०१५** रोजीच्या संगणकीय सोडतीद्वारे उलवे नोड येथे **भूखंड क्र. A-१९A, सेक्टर-१५, क्षेत्र १०० चौ.मी.** भूखंडाचे इरादापत्र देण्यात आले आहे.**(३८१/प)**

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या भूधारक **बुधीबाई हरी भोईर उर्फ सावित्री मधुकर पाटील** यांनी सह दुय्यम निबंधक यांच्याकडे हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित भूखंडाचे लाभ **कान्हा हरी भोईर उर्फ किसन हरी भोईर** यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहे. **(पृष्ठ क्र.६१३/प ते ६५३/प.)**

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिचे नाव | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|---|
| बुधीबाई हरी भोईर उर्फ सावित्री मधुकर पाटील | कान्हा हरी भोईर उर्फ किसन हरी भोईर |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोड नुसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त भूखंडाचे वाटप स्वीकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|
| कान्हा हरी भोईर उर्फ किसन हरी भोईर |

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडेबारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत /तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत /तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायलयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबददल कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबंधित गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल अशा ठिकाणी प्रसिद्ध करण्यात येईल.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२५७/२०२०-२१

# संक्षिप्त...

## वैजनाथ केंद्रातील कराळेवडी शाळेतून इंटरनेट सेवेचा शुभारंभ



**दै.रायगड नगरी । माथेरान**

९ जानेवारी रोजी रायगड जिल्हा परिषद करालेवडी येथे विद्यार्थ्यांना लॉक डाऊन काळात विद्यार्थ्यांना अध्ययन करणे सुलभ व्हावे म्हणून या शाळेत हवालदार, समाजसेवक यांच्या सहकार्याच्या माध्यमातून केंद्रातील आदर्श शिक्षक धनाजी देसले सर, जाधव सर यांनी इंटरनेट सेवा सुरू केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना कोरोना विषयक नियम पाळत अभ्यास करणे सुलभ होईल. शिवाय ज्या शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षण ऑनलाईन देणे कठीण आहे तेथे सुलभ होईल असा आदर्श निर्माण केला आहे यासाठी गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड यांचे मार्गदर्शन लाभले आहे. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे मान्यवर उपस्थित होते. केंद्रप्रमुख नारायण सोनवणे यांच्या हस्ते या महत्वपूर्ण कार्याचा शुभारंभ करण्यात आला.

## अवकळी पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे जनजीवनावर होत आहे परिणाम

**दै.रायगड नगरी खांब-रोहा**

तुरळक स्वरूपातील अवकळी पाऊस व रोजच्या ढगाळ वातावरणामुळे जनजीवनावर मोठाच परिणाम होऊन शेती क्षेत्राचेही सर्वच बाबतीत फार मोठे नुकसान होत आहे.

गेली सात आठ महिन्यांपासून कोरोना प्रादुर्भावामुळे सर्वच क्षेत्राचे मोठे नुकसान झाल्याने फार मोठी आर्थिक समस्या निर्माण झाली आहे. तर जून महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात नैसर्गिक चक्रीवादळामुळेही मोठ्याच नुकसानीला सामोरे जावे लागले होते. कोरोना महामारी आणि नैसर्गिक चक्रीवादळ यातून सावरण्याची फुरसतच मिळत नाहीत तोच दिवाळी सणाच्या पूर्वी व नुकत्याच कोसळून गेलेल्या व आज सकाळपासून तुरळक स्वरूपात बरसलेल्या अवकळी पावसामुळे शेती क्षेत्राचे फारच मोठे नुकसान झाल्याने शेतकरी वर्ग हतबल झाला आहे. अलकळी पाऊस व सध्याच्या ढगाळ वातावरणामुळे आंबा बागायतदार शेतकरी, भाजीपाल्याची शेती,कडधान्ये पिके यावर त्याचा परिणाम होऊन पिकं वाया जाण्याची भिती व्यक्त केली जाऊ लागली आहे. तर दिवाळी मोसमानंतर बागायती पिके व कडधान्ये पिके तसेच भाजीपाला शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावरच शेतकरी वर्गाची सारी मदार असते. याशिवाय संपूर्ण वर्षभराचा आर्थिक गाढाही यावरच चालविला जात असल्याने अवकाळी पाऊस व ढगाळ वातावरणामुळे शेतकरी वर्गाचे फार मोठे नुकसान झाल्याने शेतकरी वर्ग पुरता हवालदिल झाला आहे.

# ड्रायव्हरने सुस्साट टेम्पो चालविल्यानेच झाला कुडपण येथे अपघात

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील कुडपण खुर्द धनगरवाडी भागात शुक्रवारी सायंकाळी झालेला टेम्पोचा अपघात केवळ ड्रायव्हरने सुस्साट बेदरकारपणे टेम्पो चालविल्यानेच झाल्याची माहिती पोलीस तपासात उघडकीस आली आहे. सातारा जिल्ह्यातील कोंडूशी येथील गवळी समाजाची नवरीमुलगी लग्न करून रत्नागिरी जिल्ह्यातील खवटी येथे आणताना रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यात कुडपण खुर्द येथे ही दूर्घटना झाल्याचे यावेळी समजून आले आहे. अपघातातील तीन व्यक्ती मृत झाल्याने या लग्नकार्यावर शोककळा पसरली असून सातारा, रत्नागिरी आणि रायगड या तिन्ही जिल्ह्यामध्ये या दूर्घटनेची चर्चा सर्वत्र होत आहे.



रत्नागिरी जिल्ह्यातील खवटी धनगरवाडीतून टाटा ७०९ या टेम्पो (क्र. एमएच ०८जी ३०२७)मधून सातारा जिल्ह्यातील कोंडूशी या गावातील मुलीसोबत लग्न लावण्यासाठी गेलेल्या वऱ्हाडाचा परतीचा प्रवास सायंकाळी पोलादपूर तालुक्यात सर्वत्र पावसाच्या सरी कोसळल्याने जीवघेणा ठरला. या टेम्पोचा ड्रायव्हर बंटी उर्फ निलेश दत्ताराम दळवी (२७, खवटी, ता.खेड) हा निसरडा रस्ता आणि एका बाजूने दरी असूनही त्याकडे दूर्लक्ष करीत कुडपणचा घाटवळणाचा तीव्र उताराचा रस्ता वेगाने टेम्पो चालवून निघाला होता. ड्रायव्हर बंटी याला टेम्पोतील सय्यद महमद जोगिलकर याने रस्ता बघून टेम्पो काळजीपूर्वक चालविण्यासंदर्भात अनेकदा ओरडून सांगितले असता बंटी याने हा रस्ता माहितीचा असल्याचे सांगून जोगिलकर यांच्या म्हणण्याकडे दूर्लक्ष केले. साधारणपणे सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास कुडपण धनगरवाडीजवळील तीव्र वळण उतारावरून अचानक टेम्पोवरील ताबा सुटल्याने क्षणार्धात गॅबियन पध्दतीचे तकलादू संरक्षक कठडे असल्याने कठड्यासह टेम्पो साधारणपणे ६०-६५ फूट खोल दरीमध्ये झेपावला आणि वऱ्हाडाच्या गगनभेदी किंचाळ्यांनी परिसरात काही भयंकर घडल्याची चाहूल लागली.

याचवेळी लग्न झालेला नवरा मुलगा आणि नवरी हे या टेम्पोपासून काही अंतर पुढे गेले असताना त्यांनी त्यांचे वाहन मागे फिरवले. याचदरम्यान, कुडपणचे सरपंच रवींद्र चिकणे हे पत्नीसोबत कारमधून प्रवास करीत असताना त्यांना या अपघाताची जाणीव झाली आणि त्यांनी तातडीने कार थांबवून दरीकडे झेपावलेल्या ट्रकमधील वऱ्हाडीमंडळींना बाहेर काढण्यास सुरूवात केली आणि यापैकी काहींनी या अपघाताची माहिती काही अंतरावर मोबाईलच्या कव्हरेज एरियामध्ये जाऊन सर्वत्र व्हाटसअॅपवरून कळविली. कुडपण धनगरवाडी परिसरातील लोकांना या अपघाताची माहिती मिळाल्याने अनेकांनी अपघातस्थळी येऊन मदतकार्य सुरू केले. याचदरम्यान, या अपघाताबाबत सोशल मिडीयावरून सर्वत्र माहिती पोहोचल्याने पोलादपूरचे सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव आणि स्वयंसेवी व्यक्ती तसेच महाड उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे आणि रेस्क्यू टीमने अपघातस्थळी धाव घेतली. पोलादपूरचे राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे यांनीदेखील स्थानिक कार्यकर्त्यांसोबत कुडपण येथे जावून मदतकार्य सुरू केले. याचदरम्यान, रूग्णवाहिकांनीदेखील कुडपण येथे पोहोचून तब्बल साडेसात वाजता पहिल्या रूग्णवाहिकेमधून पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये जखमींना रवाना करण्यात आले. पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये खासगी डॉक्टरांसह वैद्यकीय अधिक्षिका डॉ.भाग्यरेखा पाटील आणि महाड ट्रॉमा केअर सेंटरचे डॉ.भास्कर जगताप यांनी रूग्णवाहिकेतून येणाऱ्या जखमींवर उपचार करण्यासाठी आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांचे नियोजन केले होते. पोलादपूर पंचायत समितीचे ग्रामसेवक व कर्मचारी तसेच तहसिल कार्यालयातील तहसिलदार दिप्ती देसाई आणि निवासी नायब तहसिलदार समीर देसाई तसेच तलाठी कारकून आदी कर्मचाऱ्यांनी ग्रामीण रूग्णालयामध्ये जखमींची नांवे घेऊन तातडीने उपचार करण्यास रूग्णालयाच्या वॉर्डमध्ये दाखल केले. पोलादपूर ग्रामीण रूग्णालयात ७१ वऱ्हाडी प्रवाशांपैकी ६७ प्रवाशांना दुखापती झाल्या तर तुकाराम झोरे (वय ४०, कुंभार्डे), हरिश्चंद्र भावेश होगडे (२२, तुळशी धनगरवाडी) आणि विठोबा भागोशी झोरे (६५, खवटी) हे तिघे मयत झाले. जखमींपैकी महाड व पोलादपूर परिसरातील २७ जण असून १ व्यक्ती उपचार न करता गेला तर १ मृत झाला. खेड तालुक्यातील ३९ जखमी असून २ मयत झाले तर मंडणगड येथील १ जखमी असल्याचे दिसून आले आहे. टेम्पोड्रायव्हर बंटी हा गंभीररित्या जखमी आहे. घटनास्थळी पोलीस अधिक्षक अशोक दुधे, उपअधिक्षक सचिन गुंजाळ, महाड उपविभागीय पोलीस अधिक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव अधिक तपास करीत असून ड्रायव्हर बंटी याच्याविरूध्द मोटारवाहन अपघात र.नं.३-२०२१ भा.दं. वि. ३०४, ३३७, ३३८ कलमान्वये पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## चरस हा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना गुन्हे शाखेने केली अटक ; ५ लाख रुपये किंमतीचे चरस जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चरस या अमंली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या दुक्कलीला गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाच्या पथकाने खारघर मधील ओवे गाव येथे सापळा लाऊन अटक केली आहे. महेश नेत्रप्रसाद शर्मा (३५) आणि राहुल संतोष साहु (२९) अशी या दोघांची नावे असून गुन्हे शाखेने त्यांच्याजवळ असलेला १०१० ग्रॅम वजनाचा सुमारे ५ लाख रुपये किंमतीचा चरस व नंबर नसलेली स्कुटी जप्त केली आहे. या दोघांनी सदरचे अमंली पदार्थ कुठून आणले व ते कुणाला विक्री करणार होते, याबाबत गुन्हे शाखेकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

खारघर सेक्टर-३० मधिल ओवा गाव येथील फ्युचर स्प्रिंग बिल्डींगच्या मागील बाजुस दोन व्यक्ती अंमली पदार्थांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाला मिळाली होती. त्यानुसार मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन.बी.कोल्हटकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक तांबे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय पवार पोलीस हवालदार शेंडगे, पोलीस नाईक प्रकाश साळुंखे व त्यांच्या पथकाने खारघर सेक्टर-३० भागामध्ये सापळा लावला होता. त्या भागातील फ्युचर स्प्रिंग बिल्डींच्या मागील रोडवर दोन संशयीत व्यक्ती पांढऱ्या रंगाच्या नंबर नसलेल्या स्कुटीवरुन आले असताना, त्या भागात दबा धरुन बसलेल्या गुन्हे शाखेच्या पथकाने त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र दोघांनी त्याठिकाणी पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्यांचा काही अंतर पाठलाग करुन त्यांना पकडले. यावेळी पोलिसांनी पकडलेल्या महेश नेत्रप्रसाद शर्मा व राहुल संतोष साहु या दोघांची झडती घेतली असता, त्यांच्याजवळ मोबाईल फोन व काही रोख रक्कम आढळुन आली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या स्कुटीची तपासणी केली असता, स्कुटीच्या डिकीमध्ये प्लास्टिकच्या पिशवीमध्ये १०१० ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ आढळुन आला. त्यानंतर पोलिसांनी चरस व नंबर नसलेली स्कुटी तसेच त्यांचे मोबाईल फोन व रोख रक्कम असा सुमारे ५ लाख ५५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन महेश शर्मा आणि राहुल साहु या दोघांना एनडीपीएस कलमाखाली अटक केली. या दोघांनी सदरचे अंमली पदार्थ कुठून व कुणाला विक्री करण्यासाठी आणले होते, याबबात अधिक चौकशी सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात महापालिकेची ठोस कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा वसाहत मधील पदपथ आणि रस्ते अडवून व्यवसाय करणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांवर धडक कारवाई करुन पनवेल महापालिकेने अनधिकृत फेरीवाल्यांनी कब्जा केलेले पदपथ मोकळे केले आहेत.



तळोजा मधील पाचनंद हाईट्स, कर्नाळा बँक आणि तळोजा पोलीस चौकी समोरील चौकात बेकायदा फेरीवाल्यांनी पदपथ आणि रस्ते अडवून व्यवसाय थाटल्याने नागरिकांना पदपथ आणि रस्त्यावरुन चालता येत नव्हते. 'कोरोना'मुळे लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊन मध्ये पनवेल महापालिका अधिकाऱ्यांना तळोजा मधील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करता आली नाही. त्यामुळे रस्ते आणि पदपथावर व्यवसाय करणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. अखेर महापालिका अधिकाऱ्यांनी तळोजा मधील पाचनंद हाईट्स, कर्नाळा बँक आणि तळोजा पोलीस चौकी समोरील चौकात बेकायदा व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर अचानक धडक कारवाई करुन फेरीवाले व्यवसायासाठी वापरत असलेल्या हातगाड्या तसेच बांबू आणि इतर साहित्य जप्त केले. महापालिकेने अचानक कारवाई केल्यामुळे अनेक बेकायदा फेरीवाल्यांनी हातगाडी घेवून पळ काढला.

# असाही एक अवलिया! मूर्ती लहान पण कीर्ती महान

काही लोकांना मूर्ती लहान पण कीर्ती महान ही म्हण अगदी चपखलपणे लागू होते.श्री.महेंद्र राजेंद्र महाडिक उर्फ मयूर हे व्यक्तिमत्त्वही या म्हणीला अगदी साजेसे.जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्ह्याच्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीचे म्हणजेच जिल्हाधिकाऱ्यांच्या वाहनाचे सारथी म्हणजेच वाहनचालक...सतत अगदी प्रसन्न, उत्साही, ऊर्जावान, हसतमुख, चपळाईने काम करणारी व्यक्ती. कपाळावरील लांबसडक टिळ्यामुळे तर त्यांच्या चेहऱ्यावरील तेज अधिकच खुलून येते,असे हे व्यक्तिमत्व. समाजातील विविध अडचणी सोडविणे, गोरगरिबांना मदत करणे, शासकीय कार्यालयातील सोयीसुविधांबाबतच्या अडचणी सोडविणे, राष्ट्रीय आपत्तीवेळी लागणारी मदत, या कामांसाठीही ते त्यांच्या वाहनासारखेच सुसाट धावतात.



महेंद्र राजेंद्र महाडिक उर्फ मयूर, वय वर्ष ३९, दिनांक २२ जुलै २०१२ पासून शासकीय सेवेत वाहनचालक पदावर रुजू झाले. मूळचा त्यांचा समाजसेवेचा स्वभावपिंड शासकीय सेवेत आल्यानंतर मात्र अधिकच फुलून आला.त्यांनी आजपर्यंत विविध क्षेत्रात उल्लेखनीय आणि आदर्शवत अशी कामगिरी केली आहे. काही वर्षांपूर्वी केरळ राज्यात पुरामुळे तेथील जनतेचे अतोनात नुकसान झाले. समाजाच्या सर्व स्तरा-तून येनकेनप्रकारेण त्या पूरग्रस्तांना मदत पोहोचविली जात होती. महेंद्रही त्यात मागे राहिले नाहीत. स्वतःच्या मासिक वेतनातून त्यांनी केरळच्या पूरग्रस्तांसाठी निम्मा पगार म्हणजेच दहा हजार ३४१ रुपयांचा धनादेश तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ.विजय सूर्यवंशी यांच्याकडे सुपूर्द केला.

दरवर्षी ध्वजदिन निधी संकलन मोहिमेतही महेंद्र महाडीक इतर शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये एक आदर्श कर्मचारी म्हणून ओळखले जातात. आतापर्यंत स्वतःच्या वेतनातून १० हजार ३४१ रुपये, १३ हजार ६३० रूपये (जवळपास निम्मे वेतन) ध्वजदिन निधीसाठी योगदान देणारे ते राज्यातीलच नव्हे तर बहुदा देशातील पहिले शासकीय वाहनचालक असावेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील महिलांसाठीच्या स्वच्छतागृहाबाहेर स्वच्छतागृह (महिलांसाठी) असा फलक नसल्याने कित्येकदा जिल्हाधिकारी कार्यालयात येणारे पुरुष अभ्यागतही या स्वच्छतागृहात चुकून जात होते. त्यामुळे अनेकदा काही कटू प्रसंग उभे राहण्याची परिस्थिती निर्माण झाली.

मात्र या अवघड परिस्थितीवर मात करण्यासाठी महेंद्र महाडिक यांनी तात्काळ स्वखर्चाने स्वच्छतागृह (महिलांसाठी) हा फलक बनवून या स्वच्छतागृहाबाहेर लावून टाकला. त्यांच्या या कृतीमुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्वच महिलांनी त्यांचे आभार मानले, हे वेगळे सांगायला नकोच.

मनुष्य मेहनती असेल तर त्याचे कौतुक तर होतेच परंतु तो मेहनतीबरोबरच प्रामाणिकही असेल तर त्याला साक्षात् देवही प्रसन्न होतो, हे आपणास आपण आपल्या लहानपणापासून वाचत, ऐकत आलेल्या लाकूडतोड्याच्या गोष्टीतून समजले आहे. महेंद्र महाडिक यांच्यावरही ह्या गोष्टीचा प्रभाव पडला असल्याचे त्यांच्या कृतीतून सिद्ध झाले. अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात कोणा एका व्यक्तीची सोन्याची अंगठी त्यांना एकदा सापडली. ती अंगठी महेंद्र यांनी कुठलाही मोह न बाळगता तात्काळ हाकेच्या अंतरावर असलेल्या अलिबाग पोलीस ठाण्यात जमा केली.त्यानंतर काही दिवसातच त्या अंगठीचे मालक विलास गायकवाड यांना पोलिसांकडून ती अंगठी परत करण्यात आली. यासाठी अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री.कोल्हे यांनी महेंद्र महाडिक यांचे विशेष कौतुकही केले.

अशा प्रकारे शासकीय सेवा उत्तमरित्या बजावित असताना जिल्हाधिकारी महोदयांचे सारथी म्हणजेच वाहनचालक गरजूंना मदत करण्यात सतत आघाडीवर असतात. ते उत्कृष्ट मोबाईल छायाचित्रकारही आहेत. सकारात्मकता बाळगून सतत कार्यशील राहून गरजवंताला ओळखण्याचे त्यांचे कसब तर खरोखरीच कौतुकास्पद. त्यातूनच गरजूंच्या मदतीला धावून जाण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे त्यांचा मित्रपरिवारही अफाट आहे अशा या अवलिया शासकीय वाहनचालकास त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

: **अरविंद पोतदार**

## महिला बचत गट सक्षम होण्यासाठी प्रयत्नशील राहणार : सरपंच

**दै.रायगड नगरी । तळा**

शासकीय योजनांचा लाभ मिळाल्यास महिला बचत गट सक्षम होतील हा लाभ मिळावा यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहीन असे आश्वासन गिरणे ग्रामपंचायत सरपंच सौ. ज्योती कैलास पायगुडे यांनी दिले. गिरण येथील महिला बचत गट प्रशिक्षण वर्गात त्या बोलत होत्या. सौ. पायगुडे पुढे म्हणाल्या की महिला बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय उभारत आहेत त्यातून त्यांचे सक्षमीकरण होत आहे. या महिलांना बचत गटाचे प्रशिक्षण मिळाल्यास त्या अधिक सक्षम होतील. शासनाकडून मिळणारे प्रशिक्षण महिलांनी आवर्जून घेतले पाहिजे त्यातूनच व्यवसायाची दिशा मिळेल महिलांनी स्वतःच्या पायावर कसे उभे राहता येईल हे पाहिले पाहिजे असे सौ.पायगुडे यांनी सांगितले.



गिरणे ग्राम पंचायत सरपंच ज्योती कैलास पायगुडे यांच्या प्रयत्नाने स्वदेस फाऊंडेशन व कृषी विभाग तळा यांच्या सयुक्त विद्यमाने गिरणे गाव व परिसरातील महीला बचत गटांना शेतिसंबंधी माहिती तसेच लघूउद्योग संबंधी मार्गदर्शन देण्यासाठी बचत गट प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी गिरणे ग्राम पंचायत च्या सरपंच सौ. ज्योती पायगुडे, कृषी विभागचे प्रताप कदम, सुमीत पूरी ग्रामसेवक खंडू काळे गिरणे गाव विकास समितीचे अध्यक्ष सुभाष पाशिलकर, सचिव भगवान माळी, स्वदेस फाऊंडेशन चे कृषी विभागाचे संजय भौड, निनाद दर्गे, तळा टिमचे संतोष मोरे, गिरणे ग्राम पंचायत चे स्वदेस समन्वयक बालाजी श्रीङोळे त्याचप्रमाणे गिरणे, गिरणे बौध्दवाडी नानवली, वाघवाडी येथील ७ बचत गटातील ७० महिला या शिबिराला उपस्थित होत्या.

या प्रशिक्षण शिबिरा मधे कृषी विभागाचे प्रताप कदम यांनी शासकीय योजनांची माहिती दिली यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, भाऊ साहेब फुंदे फळबाग योजना, प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना, प्रधान मंत्री पीक विमा योजना, लोकनेते गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना या सर्व योजनांबाबत सविस्तर माहिती बचत गटातील महिलांना दिली. त्याचप्रमाणे स्वदेस फाऊंडेशनच्या कृषी विभागचे निनाद दर्गे व संजय भौड यांनी सेंन्द्रीय शेती, परसबाग लागवड, मिश्र पीक पध्दती, शेती पुरक व्यवसाय व यशस्वी बचत गटांची उदाहरणे व माहिती व्हिडिओ च्या माध्यमातून दिली.



**उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे काल एका कोविड पॉझिटिव्ह गर्भवती महिलेची यशस्वी प्रसुती करण्यात आली व या महिलेने एका गोंडस बालिकेला जन्म दिला. कोविड रुग्णाची प्रसूतीची ही पहिलीच वेळ असल्याने उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर तसेच परिचरिकांनी घेतलेल्या मेहनतीबद्दल आणि त्यांना आलेल्या यशाबद्दल आज उपजिल्हा रुग्णालय येथे जाऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी आमदार मा.श्री.बाळाराम पाटील साहेब, विरोधी पक्ष नेता प्रितम म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस गणेश कडू, नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील, रुग्णालयातील डॉक्टर व परिचारिका यावेळी उपस्थित होते.**